अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 26 मार्च 2026 | वर्ष 11 वे | अंक 32 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरीत बिल्डरांचा मायाबाजार : बेकायदेशीर ले-आऊटची विक्री

### प्रशासकीय डोळेझाक की संगनमत? सामान्य गुंतवणूकदारांची मोठी फसवणूक होण्याची शक्यता

ब्रम्हपुरी/का.प्र.

शैक्षणिक आणि आरोग्याचे हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रम्हपुरी शहराची ओढ आता केवळ स्थानिकांनाच नाही, तर नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा येथील गुंतवणूकदारांनाही लागली आहे. मात्र, याच संधीचा फायदा घेत काही नामवंत बिल्डरांनी शहरात आणि लगतच्या ग्रामपंचायत हद्दीत 'प्लॉट विक्रीचा गोरखधंदा' सुरू केला आहे. नियमांना धाब्यावर बसवून आणि प्रशासनाला हाताशी धरून सुरू



असलेल्या या बेकायदेशीर कामांमुळे सामान्य जनतेच्या कष्टाचा पैसा धोक्यात आला आहे.

ब्रम्हपुरी शहराचे वाढते महत्त्व लक्षात घेता, जमिनीचे भाव गगनाला भिडले आहेत. याचाच फायदा घेत धनाड्य व्यावसायिकांनी शहराच्या परिघातील उपजाऊ शेतजमिनी विकत घेतल्या आहेत. नियमानुसार, कोणत्याही ले-आउटमध्ये पक्के रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था (नाल्या) आणि वीज पुरवठा करणे अनिवार्य असते. मात्र, ब्रम्हपुरीत चक्क शेतीवरच खुंट्या ठोकून प्लॉट्सची विक्री केली जात आहे. कोणत्याही सोयीसुविधा न देता केवळ कागदोपत्री स्वप्ने दाखवून ग्राहकांची लूट केली जात असल्याचे चित्र आहे.

शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर ले-आउट पडत असताना नगर परिषद

(उर्वरित पान क्र. ६ वर)

### ग्रीन झोनचा 'पिवळा' खेळ : ग्राहकांची दिशाभूल

**या सर्व व्यवहारातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे 'ग्रीन झोन' (हरित पट्टा) मधील शेतीचा वापर. नियमानुसार अशा जमिनीवर बांधकाम किंवा ले-आउट टाकता येत नाही. तरीही बिल्डर प्रथम कमी किमतीत ग्रीन झोनमधील जमिनी खरेदी करतात. त्यावर बेकायदेशीर ले-आउट टाकून बुकिंग सुरू करतात. त्यानंतर 'सेटिंग' लावून या जमिनी 'येलो झोन' (निवासी क्षेत्र) मध्ये रूपांतरित करण्यासाठी शासन स्तरावर प्रक्रिया राबवली जाते. या प्रक्रियेत जर जमिनीचे रूपांतरण झाले नाही, तर मात्र सर्वसामान्य प्लॉट धारकांचे स्वप्न धुळीस मिळण्याची दाट शक्यता असते. ही एक प्रकारे ग्राहकांची शुद्ध फसवणूकच आहे.**

## धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवा, अन्यथा जनआंदोलन भडकेल

### शेतकरी नेते विनोद झोडगे यांचा सरकारला निर्वाणीचा इशारा, ब्रम्हपुरी तहसिलवर धडक

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी आपला घाम गाळून पिकवलेला धान सेवा सहकारी संस्थांच्या केंद्रांवर विक्री केला आहे. मात्र, शासनाचे 'खरेदी उद्दिष्ट' (Target) संपल्याचे तांत्रिक कारण पुढे करून गेल्या ३-४ महिन्यांपासून या धानाचे ऑनलाइन बिलिंग आणि चुकारे रखडले आहेत. हा थेट अन्नदात्याचा छळ असून, येत्या ७ दिवसांत ही मर्यादा वाढवून न दिल्यास भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा लढाऊ शेतकरी नेते कॉ. विनोद झोडगे यांनी दिला आहे.

सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी शेकडो संतप्त शेतकऱ्यांसह कॉ. झोडगे यांनी तहसील कार्यालयावर धडक दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

**प्रमुख समस्या आणि वस्तुस्थिती :**



**चुकारे रखडल्याने शेतकरी हवालदिल :** मुडझा, आवळगाव, हळदा, वांद्रा, बरडकिन्ही आणि गांगलवाडी परिसरातील केंद्रांवर धान खरेदी होऊनही 'बिलिंग' ठप्प आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा उरलेला नाही.

**कर्जाचा डोंगर आणि बँकांचा तगादा :** थकीत चुकार्यांमुळे शेतकऱ्यांना पीक कर्जाची परतफेड करता येत नाहीये. बँकांचा तगादा वाढत असून व्याजाचा भुर्दंड शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसला आहे.

**प्रशासकीय उदासीनता :** खरेदी झालेली असताना केवळ सॉफ्टवेअरमधील तांत्रिक मर्यादेमुळे पैसे थांबवणे हा अन्यायकारक प्रकार आहे.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शंकरदादा सातपुते, मंगेश ठाकरे, पत्रू साखरे, अमोल राऊत, नानाजी निकुरे, चोकेश्वर मैंद, गुंडांराज निकुरे, हेमराज प्रधान यांच्यासह ब्रह्मपुरी परिसरातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'सरकारने शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये. जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांशी बोलून आम्ही तातडीने मर्यादा वाढवण्याची मागणी केली आहे. जर ८ दिवसांत सकारात्मक निर्णय झाला नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून हक्काचा लढा लढू'. – कॉ. विनोद झोडगे**






श्रीराम नवमीच्या
सर्वांना
हार्दिक शुभेच्छा...

## संपादकीय...

# ऐसे कैसे झाले भोंदू...

भोंदूगिरी करणारा नाशिकचा स्वयंघोषित कॅप्टन ज्योतिषी अशोक खरात याने अक्षरशः धुमाकूळ घातला होता आणि अनेक महिलांचे शोषण केले होते, असा त्याच्यावर आरोप आहे. स्वत:कडे दैवी शक्ती असल्याचा दावा करून, मंत्रतंत्राच्या नावाखाली संमोहन करत, पीडित महिलेवर वारंवार बलात्कार केल्याच्या आरोपाखाली त्याला अटक करण्यात आली आहे.

एका पेन ड्राईव्हमध्ये असलेले खरात याच्या संदर्भातील ५८ व्हिडीओ पोलिसांनी जप्त केले आहेत. अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या खरातकडे राजकीय भविष्य जाणून घेण्यासाठी येणाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील बडे नेते, मंत्री यांच्याप्रमाणेच इतर राज्यांतील उच्चपदस्थांचाही समावेश होता. तोंडाने रोजच्या रोज शाहू–फुले–आंबेडकरांचा जयघोष करणाऱ्या नेत्यांचे प्रत्यक्षातील वर्तन हे वेगळे असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. लोकांना मार्गदर्शन करणारे हे नेते स्वत: ची विचारशक्ती खुंटीला बांधून खरातसारख्या बाबाच्या नादी लागतात, हे संतापजनक आहे. खरात याने सिन्नर तालुक्यातील मिरगाव शिवारात उभारलेल्या ईशान्येश्वर मंदिरासह स्थापन केलेला शिवनिका संस्थान ट्रस्टही चर्चेत आला आहे. या मंदिराला अनेक नेत्यांनी भेटी देतानाच ट्रस्टवर बड्या मातब्बरांची वर्णीही लावण्यात आली आहे. ट्रस्टवर मोठमोठे नेते असल्यामुळे खरात अधिक चर्चेत आला. ईशान्येश्वर मंदिराची उभारणी केल्यानंतर शिर्डीला येणारे भाविक सिन्नर–शिर्डी रस्त्याच्या कडेला मिरगाव शिवारात असलेल्या मंदिरात दर्शनासाठी येऊ लागले. या संस्थानावर महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर या विश्वस्त आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून धार्मिक कार्यक्रम, महाशिवरात्र, श्रावणात होणारे उत्सव व गुरुपौर्णिमेला श्रीमती चाकणकर या उपस्थित असल्याचे फोटो व्हायरल झाले आहेत.

आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार श्रीमती चाकणकर यांना राजीनामा द्यावा लागला आहे. त्यांची विविध छायाचित्रे आणि व्हिडीओ व्हायरल झाल्यामुळे महायुती सरकारची पुरती नाचक्की झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांना हे कठोर पाऊल उचलावे लागले. खरातची पाद्यपूजा करतानाची, त्याच्या डोक्यावर छत्री धरतानाची त्यांची छायाचित्रे प्रसिद्ध झाली होती. धक्कादायक बाब म्हणजे श्रीमती चाकणकर या तंत्रमंत्र करत असून, त्यांनी या ढोंगी बाबाच्या सांगण्यावरून आपली अनामिका कापून घेतल्याचा आरोप शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी केला होता. श्रीमती चाकणकर यांनी आपल्यावरील आरोप नाकारले असले, तरीदेखील राजीनामा देताना त्यांनी जो युक्तिवाद केलेला आहे, तो अजिबात पटणारा नाही. आपण एखाद्या व्यक्तीला भेटल्यानंतर ती व्यक्ती नंतरच्या काळात काय करेल याची आपल्याला कल्पना नसते, अशी सारवासारव श्रीमती चाकणकर यांनी केली आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षांना याची कल्पनाच नव्हती, यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. मुळात त्यांनी स्वत:च राजीनामा द्यायला हवा होता; परंतु तो न दिल्यामुळे मुख्यमंत्र्यांना त्यांची हकालपट्टी करावी लागली.

महाराष्ट्रात जादूटोणा प्रतिबंधक कायदा करण्यात आला असून, त्याचे पालन होत असल्याचे दिसत नाही. उलट स्त्रियांचे लैंगिक शोषण करणे हे धंदे जोरात सुरू आहेत. खरातने दोन हजार कोटी रुपयांची मालमत्ता जमवली असल्याची माहिती आहे. सत्ताधाऱ्यांचे राजकीय हिशेब चुकते करण्यासाठी वेगाने काम करणाऱ्या तपास यंत्रणा या खरातसारख्या व्यक्ती अचाट संपत्ती जमवत असताना झोपलेल्या असतात का? याप्रकारचे वास्तव देशात ठिकठिकाणी पाहायला मिळते. हरियाणात तक्रार केल्यापासून १५ वर्षे बाबा रामरहीम हा मोकाट राहतो. त्याने ३०० महिलांवर बलात्कार केल्याचा आरोप होता. निवडणुका आल्या की, अटकेत असलेला हा बाबा पॅरोलवर बाहेर येतो. त्याबद्दल कोणालाही काही आक्षेपार्हही वाटत नाही. आजच्या आधुनिक आणि विज्ञानवादी काळात अंधश्रद्धेचा बाजार मांडला जात आहे. अंधभक्तांच्या मतपेटीचा फायदा घेण्यासाठी या बाबा–बुवांना राजकीय नेते जवळ करतात आणि राजकीय सत्तेचा वापर आपल्या फायद्यासाठी हे बाबा–बुवा करून घेत असतात. यामध्ये सामान्य माणसे मात्र भरडून निघत असतात.

# ब्रम्हपुरीत पेट्रोलचा तुटवडा की निव्वळ अफवा!

## टँकर वेळेवर न पोहोचल्याने उडाली होती धांदल

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरात दिनांक २३ मार्च २०२६ रोजी पेट्रोलचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याच्या चर्चेने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली होती. मात्र, हा कोणताही कायमस्वरूपी तुटवडा नसून केवळ तांत्रिक कारणास्तव पेट्रोल टँकर वेळेवर न पोहोचल्याने निर्माण झालेली तात्पुरती टंचाई होती, हे आता स्पष्ट झाले आहे. २४ मार्च रोजी सकाळपासूनच प्रमुख पंपांवर टँकर दाखल झाल्याने पुरवठा पूर्ववत झाला आहे.

२३ मार्च रोजी ब्रम्हपुरी शहरातील प्रमुख केंद्र असलेल्या साई पेट्रोल पंप आणि गीत पेट्रोल पंप येथे नियोजित वेळेत पेट्रोलचे टँकर पोहोचले नाहीत. साठा संपल्याने या दोन्ही ठिकाणची विक्री बंद करण्यात आली होती. ही बातमी शहरात वाऱ्यासारखी पसरली आणि नागरिकांनी इंधन संपणार या भीतीने इतर पंपांकडे धाव घेतली. शहरातील मुख्य पंप बंद असल्याने नागरिकांनी देलानवाडी येथील जिओ पेट्रोल पंप आणि खंडाळा येथील इंडियन ऑईलच्या पंपांवर गर्दी केली. रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. टंचाईच्या भीतीने अनेक नागरिक केवळ गाड्यांमध्येच नाही, तर प्लास्टिकच्या कॅनमध्येही ५०० ते १००० रुपयांचे जास्तीचे पेट्रोल भरून नेताना दिसले.

दि. २४ मार्च रोजी सकाळी साई आणि गीत पेट्रोल पंपावर पेट्रोलचे टँकर उपलब्ध झाले. टँकर येताच या पंपांवर पुन्हा विक्री सुरू करण्यात आली आहे. दिनाक २३ मार्च २०२६ रोजी ची गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी आजही पेट्रोल भरण्यासाठी मोठी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रशासनाकडून आणि पंप मालकांकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, पेट्रोलचा कोणताही तुटवडा नाही. केवळ टँकर येण्यास उशीर झाल्यामुळे ही स्थिती निर्माण झाली होती, त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यक साठवणूक करू नये.

**जल है तो कल है...**

# संशोधन प्रयोगशाळांना ने.हि. महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची भेट

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष गुन्हेगारी जगतात होणाऱ्या वैज्ञानिक तपासा संबंधी वापर होणाऱ्या उपकरणाबाबत सखोल माहिती




विद्यार्थ्यांनी नागपूर येथील नावाजलेल्या विज्ञान संस्था इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, भौतिकशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ आणि विश्वेशरया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांना नुकतीच भेट दिली. या शैक्षणिक भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांच्या मनात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे, विज्ञानाची आवड निर्माण करणे, विज्ञानाविषयी कुतुहल निर्माण करणे असा होता.

या शैक्षणिक भेटीमध्ये जवळपास ५० भौतिकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या वैज्ञानिक भेटीदरम्यान इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स मध्ये प्रा. सुभाशिष चंद्रा यांच्या मार्गदर्शनात घेतली. विज्ञान संस्था नागपूर येथे नोबेल पारितोषिक विजेते डॉ. सि. व्ही. रमण यांनी वापरलेल्या उपकरणांची इथंभूत माहिती प्रा. राजू बेलेकर यांच्या मार्गदर्शनात घेतली. भौतिकशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे विभागप्रमुख तथा सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. संजय ढोबळे यांच्या मार्गदर्शनात वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये होणारे विविध प्रयोग आणि त्यांचा संशोधनातील आमुलाग्र उपयोग याबाबत यथोचित माहिती विद्यार्थ्यांना डॉ. स्मिता आचार्य मॅडम यांच्या मार्फत करून देण्यात आली तसेच विश्वेशरया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये वैज्ञानिक डॉ. रुपेश गेडाम यांनी 'सुपरकंडक्टर' चे प्रत्यक्ष कार्य विश्लेषित करून सांगितले व विविध स्वयंपूर्ण वैज्ञानिक उपकरणांची यथोचित माहिती दिली.

उपक्रमाच्या यशस्वितेसाठी ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया, पदाधिकारी आणि प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर यांनी शुभेच्छा दिल्या.

## विनोदिनी

हॉस्पिटलमधील एका पेशंटच्या बिछान्याजवळ डॉक्टरांची लांबलचक चर्चा ऐकून चिंतातुर झालेल्या त्या रुग्णाने मुख्य डॉक्टरांना विचारले : "डॉक्टरसाहेब ! माझ्या आजाराबद्दल खूप शंका आहेत का?"

डॉक्टर : तुम्हाला असं का वाटलं?

रुग्णः तुमच आणि बाकीच्या डॉक्टरांचं जे इतका वेळ डिस्कशन चालले होते. त्यावरून...

डॉक्टर : (शांतपणे) हो... काही प्रमाणात त्यांचे आणि माझे मतभेद होते, पण तुम्ही अजिबात काळजी करू नका. एकमत नसलं तरी चालेल, आत्मविश्वास महत्त्वाचा. पूर्वी अशाच एका गुंतागुंतीच्या केसमध्ये बाकी सगळे डॉक्टर वेगळं बोलत होते, पण मी माझ्याच निदानावर ठाम राहिलो! आणि.. आणि... त्या पेशंटच्या पोस्ट मॉर्टेममध्ये सिद्ध झाले की मीच बरोबर होतो...!!!

# मेंडकी जि.प. शाळेचे ४ विद्यार्थी नवोदय परीक्षा उत्तीर्ण

ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे यशाची परंपरा कायम राखत यावर्षी सुद्धा काही दिवसांपूर्वीच जाहीर झालेल्या स्कूल प्रवेश परीक्षेत सहा विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले तर नुकताच जाहीर झालेल्या नवोदय प्रवेश परीक्षेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मेंडकीचे चार विद्यार्थी नवोदय विद्यालय तळोधी बाळापुर साठी सिलेक्ट झालेले आहेत.




नयन प्रभाकर जनबंधू ९५टक्के, लावण्या एकनाथ खोब्रागडे ९५टक्के, तुरुंन्यु विनय करंजेकर ९३.७५टक्के, ध्रुप संतोष नागोसे ९२.५०टक्के गुण प्राप्त केले.

या यशासाठी विद्यार्थ्यांनी व पालकांनी अहोरात्र मेहनत घेऊन हे यश संपादन केलेले आहे. मार्गदर्शक शिक्षिका कुमारी नलीना शहारे मॅडम यांनी अहोरात्र अथक परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांना जीव तोडून मार्गदर्शन केले आहे. या यशासाठी माजी मुख्याध्यापक हरिदास तलमले सर यांचे मोलाचे योगदान आहे तसेच मुख्याध्यापक नरेश पेंदाम सर, सहाय्यक शिक्षक दारोकर सर, शामकुळे मॅडम, उरकुडे सर, कावरे सर, पठाण सर, धकाते सर, घोडमारे सर, कुंभलकर सर या सर्वांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांना अभ्यासासाठी प्रेरित केलेले आहे.

नवोदयच्या प्रवेश परीक्षेमध्ये ब्रह्मपुरी तालुक्यातून ८ विद्यार्थ्यांची निवड झाली त्यापैकी ४ विद्यार्थी हे या मेंडकी शाळेतील आहेत. विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश मेंडकी शाळेसाठी तसेच ब्रह्मपुरी तालुक्यासाठी गौरवाची बाब आहे.

# ब्रम्हपुरीत युडीआयडी कॅम्प घेण्याची प्रा. देशकर यांची मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रातील ब्रम्हपुरी तालुक्यातील तसेच आसपासच्या परिसरातील दिव्यांग नागरिकांना युडीआयडी 'विशिष्ट दिव्यांग ओळखपत्र' प्राप्त करण्यासाठी चंद्रपूर येथे जावे लागत होते. ब्रम्हपुरी ते चंद्रपूर १३० कि. मी. अंतर हे जास्त असल्यामुळे दिव्यांग नागरिकांना जाणे- येण्याचा खुप त्रास होत होता.

विशिष्ट आर्थिक दृष्ट्या दुर्बल, वृध्द व गंभीर दिव्यांग व्यक्तिंना प्रवास करणे शक्य होत नाही. त्यामुळे अनेक दिव्यग्यांग नागरीकांना विशिष्ट दिव्यांग ओळखपत्र नसल्यामुळें शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. ही त्यांची गरज लक्षात घेऊन माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी दिव्यांगांचा ब्रम्हपुरी येथे दर महिन्याला विशिष्ट दिव्यांग ओळखपत्राचा कॅम्प आयोजित करण्याबाबत विनंती व निवेदन जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे यांना दिले.

याप्रसंगी डॉ. शर्मा आयुषमान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य तथा महात्मा ज्योतिराव फुले ज्ञ आरोग्य योजना जिल्हा समन्वयक तसेच डॉ. मंगेश गुलवाडे माजी शहर अध्यक्ष, चंद्रपूर, मनोज वठे माजी नगरसेवक ब्रम्हपुरी, पवन जयस्वाल शहर महामंत्री ब्रम्हपुरी उपस्थित होते.

# प्रा.डॉ. सुकेशिनी बोरकर 'हिरकणी' पुरस्काराने सन्मानित

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच झालेल्या १५ मार्च २०२६ रोजी 'अखिल भारतीय सावित्री ब्रिगेड' व 'थिऑसाफिकल ऑर्डर ऑफ सर्विस' यांच्या संयुक्त विद्यमाने, स्त्री शक्ती जागृती मेळावा आणि हिरकणी पुरस्कार उत्साहात पार पडला. यात प्रा. डॉ. सुकेशिनी बोरकर यांना 'हिरकणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




सामाजिक, साहित्यिक व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार डॉ. स्मिता मेहेत्रे यांच्या अध्यक्षतेखाली आदर्श मंगल कार्यालय, न्यू सुभेदार ले आउट, नागपूर येथे देण्यात आला. यावेळी श्रद्धा ढोमणे पोलीस सायबर क्राईम नागपूर, उद्घाटक नीताताई ठाकरे म.न.पा. नागपूरच्या महापौर असे अनेक मान्यवर उपस्थित होते. आलेल्या ६५७ प्रस्तावातून ३३ हिरकणींची निवड करण्यात आली. शॉल, हिरकणी पुरस्कार, सन्मानचिन्ह, रोपटे, विचारपुष्प, मानपत्र व इतर भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये लाला लजपतराय जयंती साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख नेते लाल-बाल-पाल या त्रयीतील एक आणि 'पंजाब केसरी' म्हणून ओळखले जाणारे लाला लजपतराय यांची जयंती २८ जानेवारी २०२६ या दिवशी देशभरात त्यांच्या शौर्याचे आणि बलिदानाचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले जाते.

पंजाबमधील धुधिके गावात २८ जानेवारी १८६५ रोजी जन्मलेल्या लालाजींनी ब्रिटीश सत्तेविरूद्ध जहाल भूमिका घेतली होती. त्यांनी स्वदेशीचा प्रसार, आर्य समाज आणि पंजाब नॅशनल बँकेच्या स्थापनेत महत्वाची भूमिका बजावली. त्यांना 'पंजाब केसरी' व 'शेर-ए-पंजाब' या नावाने देखील संबोधले गेले. सायमन कमिशन विरोधी आंदोलनाचे त्यांनी नेतृत्व केले. स्वातंत्र्य लढ्यात लढताना माझ्या शरीरावर पडलेली एक-एक लाठी ब्रिटीश सरकारच्या शवपेटीतील शेवटचा खिळा ठरेल. ह्या प्रेरणादायी वाक्याने संपूर्ण भारतीय जनतेला बळ मिळाले. १९२८ मध्ये सायमन कमिशनला विरोध करताना ब्रिटीशांच्या लाठीचार्जमधे ते गंभीर जखमी झाले आणि १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांनी वीरमरण पत्करले.

पंजाबच्या या सुपुत्राला, ज्यांनी देशासाठी आपले जीवन समर्पित केले. अशा 'पंजाब केसरी' लाला लजपतराय यांना त्यांच्या जयंती निमित्य एल. एम. बी. पब्लिक स्कूलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# जुगनाळा येथे श्रीमद् भागवत सप्ताह

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील जुगनाळा येथील सार्वजनिक हनुमान मंदिर परिसरात श्रीमद् संगीतमय भागवत सप्ताह नामसंकिर्तनाचा समारोप कार्यक्रमदिनांक २२ मार्च २०२६, रविवारला पार पडला. हा कार्यक्रम माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोदभाऊ चिमुरकर यांच्या विशेष उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.



या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खेमराजजी तिडके तालुकाध्यक्ष कॉं.क.ब्रम्हपुरी, उषाताई भोयर महिला तालुकाध्यक्षा कॉं.क.सावली, राजेशजी कांबळे माजी जि.प.सदस्य, दिपालीताई मेश्राम माजी जि.प.सदस्या, रविभाऊ मेश्राम माजी पं.स.सभापती ब्रम्हपुरी, अविनाशजी राऊत नगरसेवक ब्रम्हपुरी, लक्ष्मीताई सहारे सरपंच जुगनाळा, गोपालजी ठाकरे उपसरपंच जुगनाळा, विठ्ठलजी तुंबडे, अंकुशजी मातेरे उपसरपंच चौगान, सुरेशजी दर्वे ब्रम्हपुरी, सुयोगजी बाळबुध्दे ब्रम्हपुरी, अन्नाजी बगमारे जुगनाळा, ओमप्रकाशजी लिचडे जुगनाळा, सहारे महाराज रुपाळा, डि.के.सर मेश्राम ब्रम्हपुरी, सुरेशजी चौधरी जुगनाळा, मन्सारामजी मुळे, गिरीधरजी ठाकरे, महेशजी चौधरी कोरची आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमापूर्वी दिनांक १६ मार्च २०२६ पासून श्रीमद् संगीतमय भागवत सप्ताह नामसंकिर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचे भागवतकार म्हणून ह.भ.प. हरिदासजी महाराज दांगट मु.सालगावकर ता.परतुल जि.जालना यांनी भाविकांना मार्गदर्शन केले. १६ ते २२ मार्च २०२६ या कालवधीत दररोज धार्मिक प्रवचन, नामसंकिर्तन व भजनांचा कार्यक्रम पार पडला.

# पाणी हया नैसर्गिक साधनसंपत्तीचे नियोजन व संवर्धन आवश्यक - डॉ. रेखा मेश्राम



ब्रह्मपुरी/का.प्र.

'पाणी ही प्रत्येक प्राण्याची मुलभूत गरज असून शहराच्या मानाने ग्रामीण भागात पाण्याचा वापर कमी प्रमाणात केला जातो. ही नैसर्गिक साधनसंपत्ती जतन करणे प्रत्येकाचे कर्तव्य असून पाण्याचा योग्य प्रमाणात वापर व संवर्धन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन वाणिज्य विभागप्रमुख डॉ रेखा मेश्राम यांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात भूगोल विभाग आयोजित 'जागतिक जलदिन' कार्यक्रमात अध्यक्षपदावरुन बोलत होत्या. कार्यक्रम प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

विचारपीठावर भूगोल विभागप्रमुख डॉ राजेंद्र डांगे व मराठी विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. डॉ. खानोरकरांनी, सकाळपासून रात्रोपर्यंत पाणी ही नित्याची गरज असून पिण्यायोग्य पाणी शासनाने जनतेला द्यायचे असते. हा नैसर्गिक साठा जतन करणे महत्त्वाचे आहे, असे विचार मांडले तर डॉ डांगेंनी पाण्याचे नियोजन, जतन, संवर्धन, स्तोत्र, काळजी यावर सचित्र प्रकाश टाकला. संचालन डॉ आशिष साखरकर तर उपस्थितांचे आभार डॉ कढवनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा.कार, प्रा.पिसे व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# बौध्द धम्मात शिलाचे पालन करणे आवश्यक

## - भन्ते आनंद महाथेरो

ब्रम्हपुरी/का.प्र.

'बौद्ध धम्म हा शिलाचे पालन करणारा धम्म आहे कारण बुद्धाचा धम्म शिलावर आधारित



आहे. धम्माचे मुळच शिल आहे म्हणुन प्रत्येकांनी शिल आचरणात आणणे आवश्यक आहे. कारण शिल आचरणात नाही तर आनापानाला काही महत्वच राहणार नाही, अशा प्रकारचे मार्गदर्शन अखिल भारतिय भिक्खुसंघाचे अध्यक्ष भन्ते आनंद बुद्धगया यांनी ब्रम्हपुरी येथील राजीव गांधी सभागृह येथे दि. २२ मार्च २०२६रोजी येथील कुर्झा रोड वरील राजीव गांधी सभागृह येथे पार पडलेल्या बौद्ध धम्म परिषदेत केले.

धम्ममाला फाऊंडेशन ब्रम्हपुरीच्या वतीने घेण्यात आलेल्या बौध धम्म परिषदेचे अध्यक्ष म्हणुन पुज्य भन्ते आनंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन छबुताई काळबांधे नागपुर यांचे हस्ते पार पडले. मंचकावर भन्ते बुद्धघोष, भन्ते सत्यानंद, भन्ते अभयनायक, भन्ते प्रज्ञानंद, भन्ते भारतद्वाज, भन्ते सुबोध, भन्ते धम्मविरिय चामोर्शी आदि प्रामुख्याने उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणुन डॉ. राजकुमार शेंडे,धम्मबंधु प्रा. मुनिश्वर बोरकर गडचिरोली, सामाजिक कार्यकर्त्या शुशीला भगत, इंजि. सोनुताई रामटेके पुणे आदिची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून विनोद माटे ब्रम्हपुरी तर प्रमुख आयोजक गुणवंत डोर्लीकर उपस्थित होते.

यापसंगी भन्ते सत्यानंद, भन्ते प्रज्ञानंद, डॉ. राजकुमार शेंन्डे, प्रा. मुनिश्वर बोरकर,इंजि. सोनुताई रामटेके, शुशीला भगत यांचेही धम्माप्रती मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुणवंत डोर्लीकर यांनी, संचालन भन्ते धम्मानंद खापरी तर आभार प्रदर्शन धम्मा मुंडरके यांनी केले. कार्यक्रमास हजारो बहुसंख्य उपासकांची उपस्थिती होती.

# हीच तर स्त्री शक्तीच्या नव्या पर्वाची शक्तीशाली पहाट आहे

## - प्रा. अतुल देशकर



ब्रम्हपुरी/का.प्र.

श्रीमती सुषमा स्वराज नाविन्यपूर्ण महिला सेवा सहकारी संस्था मेंडकी आणि भाजपा महिला मोर्चा मेंडकी यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदू नववर्ष आणि गुढीपाडव्याच्या मंगलमय दिनाचे औचित्य साधून, मेंडकी येथे प्रथमच महिलांसाठी भव्य सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन दिनांक १९ मार्च रोजी करण्यात आले. या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे ही स्पर्धा फक्त विवाहित महिलांकरिता आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली.

यावेळी अध्यक्षीयस्थानावरून संबोधित करताना प्रा.अतुलभाऊ देशकर म्हणाले की, आजचा दिवस दुर्मिळ दुग्ध शर्करा योग आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एका मुहूर्तावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्त्री शक्तीकरीता आयोजित ही स्पर्धा, स्त्री ही आता कोणत्याही क्षेत्रात मागे नाही हे दाखवणारी स्पर्धा आहे.चाकोरीबध्द बंधने तोडून नव्या पर्वाच्या दिशेने वाटचाल करणारी ही स्पर्धा आहे.

यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्षा रश्मिताई पेशने, नगरसेवक प्रा.मनोज भूपाल, भाजयुमो जिल्हा महामंत्री तनय देशकर, प्रा.यशवंत आंबोरकर, भाजपा शहर महामंत्री प्रशांत वसाके, पवन जयस्वाल, आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वंदना शेंडे, संचालन कल्पना बोरूले तर आभार प्रदर्शन जयश्री आंबोरकर यांनी केले.

# ब्रम्हपुरी-उमरखेड बससेवा पूर्ववत करा

## प्रवासी सेवा असोशिएशनची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

उमरखोड-पुसद-दारव्हा-वणी, यवतमाळ या मार्गाने प्रवास करण्यासाठी ब्रम्हपुरी आगाराची एकही बस नसल्यामुळे ब्रम्हपुरी पासून सदर मार्गाने प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, प्रवाशी, नागरिक, महिला, व्यापारी यांना कमालीचा त्रास सहन करावा लागत होता. प्रवाशांची होणारी अडचण लक्षात घेता प्रवाशी सेवा असोशियशन शाखा ब्रम्हपुरीचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ता प्रशांत डांगे यांनी प्रशासनाकडे वारंवार निवेदन देऊन ब्रम्हपुरी उमरखेड बससेवा सुरु करण्याची मागणी केली होती त्यांच्या मागणनीला यश येऊन मागील तीन चार वर्षांपासून ब्रम्हपुरी उमरखेड बस्सेवा नियमित सुरु होती. प्रवाशांचा प्रतिसाद मिळत असल्याने या मार्गाने आगाराला भरपूर उत्पन्न मिळत होते.

मात्र, मागील पंधरा ते विस दिवसापासून ब्रम्हपुरी उमरखेड बस सेवा बंद केल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट



पसरलेली आहे. प्रवाशांना प्रवास करताना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. ब्रम्हपुरी उमरखेड बससेवा पूर्ववत सुरु करा या मागणीचे निवेदन प्रवाशी सेवा असोशिएशन शाखा ब्रम्हपुरीचे अध्यक्ष प्रशांत डांगे यांच्या नेतृत्वात आगार व्यवस्थापक जयकुमार इंगोले यांना देण्यात आले. निवेदनातून जर मागणी पूर्ण न झाल्यास प्रवाशी सेवा असोशिएशन शाखा ब्रम्हपुरी तर्फे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. निवेदन देताना प्रवाशी सेवा असोशियशन शाखा ब्रम्हपुरी चे राहुल भोयर, अमरदीप लोखंडे, शरद भानारकर, रमाकांत अरगेलवार् तसेच आदी सदस्य उपस्थित होते.

# ने.हि. महाविद्यालयात शहिद दिन



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांची पुण्यतिथी, शहिद दिन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात केली.

त्यानंतर जयघोष करण्यात आला व उपस्थित डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ धनराज खानोरकर, डॉ रतन मेश्राम, डॉ अरविंद मुंगोले, प्रा धिरज आतला, प्रा जयेश हजारे, डॉ किशोर नाकतोडे, अधीक्षक संगीता ठाकरे, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, डॉ ज्योती दुपारे, प्रा खोब्रागडे, प्रा कोमल ठोंबरे, सुषमा राऊत इत्यादी मान्यवरांनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

# ब्रम्हपुरी न.प.कडून २१६ दिव्यांगांना ५ टक्के निधीचे वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर परिषदेकडून दिव्यांग कल्याणकारी योजने अंतर्गत दिव्यांगासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचे वाटप RTGS प्रणाली द्वारे दिनांक २०/०३/२०२६ ला करण्यात आले. एकूण २१६ दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी २,७७७/- रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.



हा निधी नगर परिषदेचे अध्यक्ष योगेश मिसार, मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे, सभापती मनोज कावळे, सभापती सचिन राउत, नगरसेवक राकेश पडोळे व नगरसेवक जगदीश पिलारे यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. या प्रसंगी लेखापाल नकुल भाजीपाले, लेखापाल विवेक गाडगे, सहा. प्रकल्प अधिकारी धनंजय पोटे उपस्थित होते. या उपक्रमामुळे दिव्यांगांना आर्थिक आधार मिळून त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यास मदत होणार आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी अशा योजनांचे महत्त्व अधोरेखित करत, या उपक्रमांमुळे त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत असल्याचे सांगितले. तसेच, भविष्यातही दिव्यांग कल्याणासाठी अशाच योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या निर्णयामुळे दिव्यांगांनी समाधान व्यक्त केला.

# नवनीत चित्रकला स्पर्धेत स्पंदन व देवांश जिल्हयात अव्वल



ब्रम्हपुरी/का.प्र.

नवनीत प्रकाशन तर्फे आयोजित मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेत स्थानिक ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथील वर्ग चौथीची विद्यार्थिनी कु.स्पंदन गोवर्धन दोनाडकर तसेच वर्ग आठवीचा विद्यार्थी देवांश मनीष महाजन यांनी यश संपादन करून त्यांच्या चित्रांची उत्कृष्ट चित्र म्हणून संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यातून निवड झालेली आहे.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर पावना व विद्यालयातील कलाशिक्षक लेकराम डेंगे यांच्या हस्ते कु.स्पंदन दोनाडकर व देवांश महाजन यांना स्कूल बॅग व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पंदन व देवांश यांच्या चित्रांची राज्यस्तरीय मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. सदर स्पर्धेमध्ये ख्रिस्तानंद विद्यालयातील ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. कु.स्पंदन गोवर्धन दोनाडकर व देवांश मनीष महाजन यांना शाळेतील कलाशिक्षक लेकराम डेंगे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापक फादर कुरियन, मुख्याध्यापिका सिस्टर पावना, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक यांनी कौतुक केलेले आहे.

# ट्विंकल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची न.प.ला शैक्षणिक भेट

नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथील विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यपद्धतीची माहिती मिळावी या उद्देशाने नगरपरिषद नागभीड येथे शैक्षणिक भेट दिली.



या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना नगरपरिषद सभागृहाची पाहणी करून देण्यात आली तसेच नगरपरिषदेचे दैनंदिन कामकाज, विविध विभागांची कार्यपद्धती, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा यांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाची प्रत्यक्ष ओळख होऊन त्यांच्या ज्ञानात भर पडली. या प्रसंगी मुख्याधिकारी सोनम देशमुख यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बांधकाम विभागाचे अभियंता प्रतीक मुनेश्वर तसेच श्रद्धा करांडकर (करनिर्वहन व प्रशासकीय अधिकारी) यांनीही विद्यार्थ्यांना विविध विभागांबाबत माहिती देऊन शंकांचे निरसन केले.

संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर व सचिव अजय काबरा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्राचार्या शुभांगी पोहेकर, मुख्याध्यापिका संगीता नारनवरे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या साईटला भेट द्या


## रजिस्ट्रेशन ऑफ न्युजपेपर

रूल्स १९५६ अंतर्गत

**अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार**

**मालकी व अन्य माहिती तक्ता - ४**

(नियम ८ पहा)

| | | |
|---|---|---|
| १) वृत्तपत्राचे नांव | : | अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार |
| २) प्रकाशनाचे ठिकाण | : | मु.पो.ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ३) प्रकाशन काळ | : | अर्धसाप्ताहिक |
| ४) मुद्रकाचे नांव | : | राजीव पाचपोर |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु. मोदी नं. १ सिताबर्डी, नागपूर |
| ५) प्रकाशकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.ता.पो. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ६) संपादकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.ता.पो. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |
| ७) वृत्तपत्र मालकाचे नांव | : | अशोक भैया |
| भारताचे नागरिक आहेत काय | : | होय |
| पत्ता | : | मु.पो.ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर |

**मी अशोक भैया असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशिल पुर्णपणे खरा आहे.**

**स्वाक्षरी**

दि. २६/०३/२०२६

**अशोक भैया**

प्रकाशक/मालक/संपादक


# सौमेश्री जनबंधू हिचे नवोदय परीक्षेत यश



ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील महाराष्ट्र विद्यालय, पिंपळगाव भोसले येथील इयत्ता ५ वीची विद्यार्थिनी कु. सौमेश्री मिथुन जनबंधू हिने नवोदय पात्रता परीक्षा २०२५-२६ मध्ये दैदिप्यमान यश संपादन केले आहे. तिने या परीक्षेत ९३.७५ टक्के गुण मिळवून जवाहर नवोदय विद्यालयासाठी आपली निवड निश्चित केली आहे. या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, शाळेने दरवर्षी विद्यार्थी पात्र ठरवण्याची आपली गौरवशाली परंपरा यावर्षीही कायम राखली आहे.

सौमेश्रीच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने विशेष कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे यांच्या हस्ते तिला पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी वर्गशिक्षक नाकाडे सर, तसेच पुरी सर, महाले सर, मेश्राम सर आणि इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले.

**... QUOTES ...**

**"If people are doubting how far you can go, go so far that you can't hear them anymore."**

**- Michele Ruiz**

**चा रो ळी**

*तुम्ही प्रेम विकत घेऊ शकत नाही*
*हे जरी खरे आहे...*
*तरी सर्व खर्च मात्र प्रेमापोटीच करतो,*
*हे मात्र खरे आहे...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये प्रि-स्कुल विद्यार्थ्यांचा 'ग्रॅज्युएशन डे' संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये मंगळवार दि २४ मार्च २०२६ ला प्रि-स्कुल विभागातील केजी-२ च्या विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन डे साजरा करण्यात आला. ग्रॅज्युएशन डे हा कार्यक्रम शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पडला. सदर कार्यक्रमाला शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, स्कुलचे प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम या सर्वांची उपस्थिती लाभली.

प्रसंगी मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात Thank you, Thank you everyone या Graduation Song नी करण्यात आली. या गाण्यावर केजी-२ च्या दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांनी अप्रतिम नृत्य सादर केले.

ग्रज्युएशन डे च्या दिवशी ज्याप्रमाणे पदवीधर विद्यार्थ्यांना दिक्षांत समारंभात पदवी प्रदान केली जाते. त्याच प्रमाणे केजी-२ च्या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्गात प्रवेश केल्याबद्दल Graduation Day च्या पोशाख घालून त्यांना प्रमाणपत्राचे वितरण संचालिका मॅडम आणि प्राचार्य सर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी शाळेच्या सचालिका मॅडम आणि प्राचार्य सर यांनी कार्यक्रमाबद्दल विचार व्यक्त करीत लहान चिमुकल्यांचे कौतुक करत आपले मनोगत व्यक्त केले अशा प्रकारे सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या काही पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये त्यांनी शाळेचे व्यवस्थापन, शिक्षण, शिस्त, वातावरण तसेच केजी-२ च्या शिक्षिका यांचे विशेष कौतुक केले व विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते, याबद्दल आनंद व्यक्त केला.

# महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथे शहीद दिन साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.


दि २३.३.२०२६ रोजी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला महाविद्यालयात आहुती दिली त्या सर्व देशभक्तांना सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. तरारे, प्रा.देवाशीष भरणे तसेच आशिष गजपुरे, सकलेन पठाण, मनीष खरकाते, संजय आलेवार हे उपस्थित होते.



शहीद दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे आणि राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन यांनी पुष्पहार आणि फुले अर्पण करून आदरांजली वाहिली.

देशाच्या स्वातंत्र लढ्यात ज्या देशभक्तांनी आपल्या प्राणाची

या प्रसंगी प्रा.अनुप बारसागडे, प्रा.सुहास साकरकर, प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा.छगन डोईजड, प्रा.भूपेश भेंडारकर, प्रा. सविता वसाके, प्रा. विजया सोनवणे, प्रा. पूजा घुटके, प्रा. प्राची मांडवे, प्रा. अमिषा जयस्वाल, प्रा. दिशा मुल, प्रा.प्रसंजित लांडगे, प्रा.राकेश

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट

स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# ब्रम्हपुरीत बिल्डरांचा मायाबाजार...

(पान क्र. १ वरून)

प्रशासन आणि महसूल विभाग मूग गिळून गप्प का आहे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सामान्य माणसाने छोटेसे बांधकाम केल्यास तत्काळ नोटीस बजावणारे प्रशासन, या बड्या बिल्डरांच्या गोरखधंद्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते. यामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बाहेरगावच्या गुंतवणूकदारांची गर्दी होत असून नागपूर, गडचिरोली आणि चंद्रपुरातील धनाढ्य लोकांकडून गुंतवणुकीच्या नावाखाली जमिनींची खरेदी चा सपाटा सुरू आहे. वाढत्या किमतींमुळे मध्यमवर्गीयांना घर बांधण्यासाठी प्लॉट घेणे अशक्य झाले आहे. ना रस्ते, ना सांडपाण्याची व्यवस्था; तरीही नियम धाब्यावर बसवून विक्रीचा सपाटा सुरू आहे. ब्रम्हपुरी परिसरात प्लॉट खरेदी करताना तो ले-आउट मंजूर आहे का, जमीन कोणत्या झोनमध्ये येते आणि तिथे रस्ते-नाल्यांची सुविधा आहे का, याची शहानिशा करणे आवश्यक आहे. अन्यथा, बिल्डरांच्या या मायाबाजारात तुमचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

# ब्रम्हपुरीच्या कुर्झा वार्डात देशी दारूची अवैध विक्री जोमात

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील कुर्झा वार्डात देशीची दारुच्या अवैध विक्रीचे अनेक ठिकाणी दुकाने असून वार्डातील नागरिकांचे त्यामुळे स्वास्थ बिघडल्याचे निर्दशनास आले आहे. काही आंबटशौकीन ग्राहक पहाटे पाचपासून दारु ढोसत असून या दारु दुकानात 'मागेल तेव्हा देशी' मिळते आहे.

या अवैध देशी दारुमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले असून वार्डातील अनेक तरुण पोरं मरणासन्न अवस्थेत पोहचले आहेत. मागेल तेव्हा सहज उपलब्ध होणाऱ्या या दारुमुळे अनेकांना मानसिक त्रास होत असून पहाटे पाचपासून रात्रो अकरा पर्यंत ही अवैध देशी विक्री दुकान सर्रास खुली राहतात. अनेकांनी सांगूनसुध्दा दुकानदार ऐकत नाही. काही ठिकाणी तर रात्रोला केव्हाही उठविले तरी तो घरमालक आपल्या घरुन देशीचा टिल्लू काढून देतो आहे. प्रत्येक रोडवर ही अवैध देशी दारू विक्री दुकान असून ही देशी दारुविक्रेते गब्बर होत आहेत आणि जनतेचे स्वास्थ बिघडत चालले आहे.

पोलिस प्रशासनाने तातडीने याची कडक कारवाई करुन ही अवैध देशी दारू दुकाने कायमची बंद करावी, अशी वार्डातील महिला मंडळ, दुर्गा मंडळ व जनतेची एकमुखी मागणी आहे.


Lubi PUMPS • MOTORS

बुधवार बंद

दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404